## पुंसवन [पुत्रप्राप्ती]

पुंसवन कर्म हे गर्भ राहिल्यापासून २,३,४, महिन्यात करावयाचे कर्म आहे. पौरुषपूर्ण व सुदृढ संतती निर्माण होण्यासाठी करावयाचा हा संस्कार आहे. सुदृढ आणि स्वास्थ्यपूर्ण संततीच्या जन्मासाठी म्हणून हा संस्कार केला जातो. गर्भ राहिल्यानंतर भावी मातेचा आहार, आचार विचार, व्यवहार, चिंतन - मनन, भाव या सर्वांना उत्तम आणि संतुलित ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. हिंदू धर्मामध्ये, संस्कार परंपरेच्या अंतर्गत भावी माता-पित्यांना ही तथ्य समजावून दिली जातात की शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या परिपक्व झाल्यानंतर, समाजाला श्रेष्ठ आणि तेजस्वी अशी नवीन पिढी देण्याच्या संकल्पा सोबतच संतानाला जन्म देण्याचा प्रपंच करावा. त्याकरिता अनुकूल असे वातावरण देखील निर्माण केले जाते. गर्भाच्या तिसऱ्या महिन्यात विधिवत पुंसवन संस्कार संपन्न करण्यात येतो, कारण या वेळेपर्यंत गर्भातील बाळाच्या विचार तंत्राचा विकास सुरु होत असतो. वेद मंत्र, यज्ञाचे वातावरण आणि संस्कार सूत्र यांच्या प्रेरणेमुळे बाळाच्या मनावर श्रेष्ठ असा प्रभाव तर पडतोच, परंतु भाविक आणि परिजन यांना देखील प्रेरणा मिळते की भावी मातेसाठी श्रेष्ठ मनःस्थिती आणि परिस्थिती कशी विकसित केली जाऊ शकते.

### क्रिया आणि भावना

पुंसवन - पुमान म्हणजे वीर्यवान (बलवान) संतती ज्या संस्काराच्या योगाने होते त्याला पुंसवन म्हणतात. हा संस्कार गर्भाचे स्पष्ट ज्ञान झाल्यावर २,४,६ किंवा ८ यांतून कोणत्याही महिन्यात करावा. किंवा सिमंतोन्नयन संस्काराबरोबर करावा. यामध्ये अनवलोभन संस्कार मध्ये येतो. तो ही काहीजण करतात. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे उपसंस्कारातील संस्कार समजावा, माझ्या पत्नीचे ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या सर्व गर्भाचे बीजासंबंधी व गर्भासंबंधी देवांचा परिहारपुर्वक पूरुष देवतेच्या ज्ञानोदयाच्या प्रतिबंधकाचा परिहार व्हावा म्हणून पुंसवन संस्कार व अनवलोभन संस्कार तसाच माझ्या पत्नीचे ठिकाणी गर्भाची वृद्धी होण्यास प्रतिबंध करणाऱ्या मांस, रुधिरप्रिय असणाऱ्या राक्षसींच्या समुदायांचा नाशपूर्वक क्षम व सकल सौभाग्याचे मुलकारण महालक्ष्मी च्या प्रवेशद्वाराने प्रत्येक गर्भामध्ये बीज आणि गर्भ यांपासून उत्पन्न होणाऱ्या पापांचा नाश करणाऱ्यांचा अतिशयद्वाराने स्त्रीसंस्काररुप सीमंतोन्नयन नावाचा संस्कार असे पुंसवन, अनवलोभन, सिमंत असे तीनही संस्कार करतो.

अनवलोभन - अनवलोभन म्हणजे पतन ते न होणे म्हणजे अनवलोभन म्हणजे गर्भपतन न होऊ देणे (miscarriage) आहे. म्हणून पुंसवन व अनवलोभन हे संस्कार पहिल्या गर्भाचे केले तथापि हे गर्भसंस्कार असल्यामुळे दर एक गर्भाचेही करावे. पुंसवन, अनवलोभन संस्कारामुळे तीन हेतु साध्य होतात.

१) गर्भ बलवान होतो. २) गर्भपात होत नाही. ३) बालक पूर्ण दिवस झालेनंतर जन्माला येते.

गर्भ पूजनासाठी गर्भार महिलेच्या परिवारातील सर्व वयस्क आणि परिजनांच्या हातात अक्षता, फुले देण्यात यावीत. मंत्र म्हणावेत. मंत्र समाप्त झाल्यानंतर एका ताम्हणात एकत्र करून गर्भार महिलेला देण्यात यावे. तिने त्याचा पोटाला स्पर्श करावा आणि ठेवून द्यावे. यावेळी अशी भावना करावी की गर्भातील बाळाला सद्भाव आणि अनुग्रहाचा लाभ देण्यासाठी हे पूजन करण्यात येत आहे. गर्भार महिला त्याचा स्वीकार करून गर्भाला त्याचा लाभ होण्यात सहयोग करत आहे.

ॐ सुपर्णोऽसि गरुत्माँस्त्रिवृत्ते शिरो, गायत्रं चक्षुबगृहद्रथन्तरे पक्षौ । स्तोमऽआत्मा छन्दा स्यङ्गानि यजूषि नाम । साम ते तनूर्वामदेव्यं यज्ञायज्ञियं पुच्छं धिष्ण्याः शफाः। सुपर्णोऽसि गरुत्मान् दिवं गच्छ स्वःपत।।

**HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA**

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com